# कार्यालय, नागपूर महानगरपालिका नागपूर

## (सचिवालय)

## सुचना

परिवहन समितीची सभा, गुरूवार दि. ०९/०१/२०२० रोजी सकाळी १०:३० वाजता सिव्हील लाईन्स कार्यालयातील **डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती, सभागृहात** खालील विषयावर चर्चा करण्याकरिता भरणार आहे.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांक – ०६/०१/२०२०

**(राजेश एम. मोहिते)**
उपायुक्त तथा
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

**विषय क्रमांक ०२ :–** मनपा परिवहन समिती ठराव क्र. ०८, दि. २६/०८/२०१९ अन्वये जुन्या कंडम (भंगार) बसेस निर्लेखित करण्याकरिता निर्णयार्थ संपुर्ण अधिकार एकमताने मा. सभापती, परिवहन समिती यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत प्रक्रियेची अद्यावत स्थिती जाणुन घेण्याकरिता तसेच मा. आर्बीट्रेटर यांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही तातडीने करण्याकरिता चर्चेस्तव व निर्णय घेण्यास्तव प्रश्न विचारात घेणे.

टिप :– सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ०३ :–** केंद्रिय शासनाच्या पर्यावरणपुरक धोरणाप्रमाणे व प्राप्त प्रस्तावाअन्वये नागपूर महानगरपालिकेकरिता १०० नविन ईलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्याकरिता प्रस्तावित केले आहे. याबाबत केंद्र शासनातर्फे बस मॉडेल निहाय अनुदान प्रस्तावित आहे तथापी मनपावर याबसेसमुळे अतिरिक्त बोजा पडणार असुन धोरणात्मक निर्णय असल्याने या खरेदी प्रक्रियेला महासभेची मान्यता आवश्यक आहे.

उपरोक्त बसेसकरिता मनपाला वहन करावयाचा खर्च व व्यवहार्यता (Vaibility) बाबत पडताळणी करून मा. आयुक्त यांचे प्राप्त आदेशान्वये १०० नविन ईलेक्ट्रीक बसेस पैकी ४० ईलेक्ट्रीक बसेस या खरेदी करण्याचे निश्चित करण्याचे आले असुन या आधारे ४० ईलेक्ट्रीक बसेस खरेदी करण्याकरिता विहीत करण्यात आलेल्या मुदतीमुळे आर.एफ.पी प्रसिद्ध करण्यात आली आहे, यास मा. समितीने कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ०४ :—** नागपूर शहरातील महिलांसाठी व प्रवासी महिलांकरिता मोबाईल टॉयलेट योजना राबवुन सुलभ प्रसाधन गृहाची व्याप्ती वाढविण्याकरिता जुने भंगार बस चा वापर सुलभ फिरते शौचालयाकरिता करण्याचे मा. महापौरजी यांनी निर्देशित केलेले असुन याकरिता प्रावधानाची तरतुद महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेली आहे.

प्रायोगीक तत्वावर मनपा मालकीच्या दोन जुन्या स्डॅडर्ड बसेस यांना फिरते शौचालयामध्ये रूपांतरीत करण्याकरिता व मे. साराप्लॉस्ट प्रा.लि., पुणे हे देशातील एकमेव अधिकृत कंपनी असल्यामुळे उपरोक्त काम सदर फर्मला देण्याकरिता व कंपनीच्या प्रस्तानुसार येणाऱ्या खर्चास उक्त प्रस्ताव स्थायी समिती समक्ष पाठविण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ०५ :—** मा. सभापती, परिवहन समिती यांनी दिलेल्या तत्वत: मान्येतेनुसार व मा. अपर आयुक्त यांचे दि.८/११/२०१९ वरील मान्यतेनुसार ०१ विना तिकिट ते ०५ विना तिकिट आढळलेल्या दोषी वाहकास तिसऱ्या वेळेस शेवटची संधी देवून एस.ओ.पी.मधे ठरलेल्या कालावधी नुसार एक अपहार प्रकरणी रु. दोन हजार प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करुन आय.डी. उघडण्यात आलेल्या आहेत. यास कार्योत्तर मंजुरी देण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

२. दि.३०/१२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. सभापती यांनी अपहारकर्त्या वाहकांसाठी स्वतंत्र चौकशी विभाग तयार करण्याचे व अशा वाहकांची आय.डी. बंद करुन कामावरुन वंचित करण्यापुर्वी त्यांना सुनावणीची संधी देण्यास्तव सर्वश्री रविंद्र पागे, प्रशासकीय अधिकारी, अरुण पिपरुडे, श्रम तथा जनसंपर्क अधिकारी, सुर्यकांत आंबाडेकर, आर.टी.एल. (डिम्ट्स )यांची ०३ सदस्यीय समिती गठीत करुन दर १५ दिवसांनी प्रकरणे तपासुन जर अपहारकर्ता वाहक दोषी आढळल्यास आय.डी. बंद करण्याचा निर्णय घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ०६ :—** नागपूर शहर बस परिवहन सेवेमध्ये मे. युनिटी सेक्युरिटी सर्व्हिसेस व मे. सेक्युरिटी व इंटेलिजन्स सर्व्हिसेस (इंडिया)लि., एस.आय.एस. हे कार्यरत आहेत. मे. सेक्युरिटी व इंटेलिजन्स सर्व्हिसेस (इंडिया) लि., एस.आय.एस. यांनी त्यांचे पत्र दि.२९/११/२०१९ अन्वये त्यांच्या सेवा मनपास देण्याची असमर्थता दर्शविलेली असून कंत्राट बंद करण्याची विनंती केलेली आहे. यानुसार विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि.१/१/२०२० ला मंजुरी प्रदान केलेली आहे. या अनुषंगाने त्यांचेकडे असलेले वाहक कर्मचारी पुर्ण आस्थापना व इंफ्रास्ट्रक्चर्ससह मे. युनिटी सेक्युरिटी सर्व्हिसेस, नागपूर यांचेकडे नविन एजेंसी आर.एफ.पीद्वारे नियुक्त होईस्तोवर हस्तांतरित करण्याचा व उपायुक्त/परिवहन व्यवस्थापक यांचेकडे झालेल्या दि.०६/१२/२०१९ च्या सभेमध्ये मे. डिम्ट्स/आय.बी.टी.एम. यांना नविन वाहक पुरवठा एजेंसी नियुक्त करण्याकरीता आर.एफ.पी. तयार करण्यास्तव दिलेले निर्देश मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

————————————————X————————————————

परिवहन समितीच्या सभा, गुरूवार दि. ०९/०१/२०२० रोजी सकाळी १०:३० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. नरेंद्र गोविंदराव बोरकर** | **सभापती** |
| 2 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | **सदस्या** |
| 3 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| 4 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| 5 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | **सदस्य** |
| 6 | मा. सौ. रुपाली प्रशांतसिंह ठाकुर | **सदस्या** |
| 7 | मा. सौ. विशाखा शरद बान्ते | **सदस्या** |
| 8 | मा. श्री. नागेश महादेव मानकर | **सदस्य** |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. प्रदीप वसंतराव पोहाणे<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | **सदस्य** |
| 2 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | **सदस्य** |
| 3 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | **सदस्य** |
| 4 | मा. श्री.राजेश श्रावणजी घोडपागे | **सदस्य** |
| 5 | मा. सौ. रुपा शेखर रॉय | **सदस्या** |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. राजेश मोहिते** | **परिवहन व्यवस्थापक** |

सुरवातीला प्रशासनामार्फत नवनिर्वाचित मा. सभापती यांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर मा.सभापती, परिवहन समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक ०२</u>** :– मनपा परिवहन समिती ठराव क्र. ०८, दि. २६/०८/२०१९ अन्वये जुन्या कंडम (भंगार) बसेस निर्लेखित करण्याकरिता निर्णयार्थ संपुर्ण अधिकार एकमताने मा. सभापती, परिवहन समिती यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत प्रक्रियेची अद्यावत स्थिती जाणुन घेण्याकरिता तसेच मा. आर्बीट्रेटर यांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही तातडीने करण्याकरिता चर्चेस्तव व निर्णय घेण्यास्तव प्रश्न समितीने विचारात घेवून आरटीओने अद्याप क्लिअरन्स् न दिल्यामुळे आरटीओच्या संबंधित अधिका–याला पुढच्या बैठकीत बोलाविण्यात यावे तसेच या विषयातील संपुर्ण अधिकार मा. सभापती श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, यांना देण्यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ०३** :— केंद्रिय शासनाच्या पर्यावरणपुरक धोरणाप्रमाणे व प्राप्त प्रस्तावाअन्वये नागपूर महानगरपालिकेकरिता १०० नविन ईलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्याकरिता प्रस्तावित केले आहे. याबाबत केंद्र शासनातर्फे बस मॉडेल निहाय अनुदान प्रस्तावित आहे तथापी मनपावर याबसेसमुळे अतिरिक्त बोजा पडणार असुन धोरणात्मक निर्णय असल्याने या खरेदी प्रक्रियेला महासभेची मान्यता आवश्यक आहे.

उपरोक्त बसेसकरिता मनपाला वहन करावयाचा खर्च व व्यवहार्यता (Vaibility) बाबत पडताळणी करून मा. आयुक्त यांचे प्राप्त आदेशान्वये १०० नविन ईलेक्ट्रीक बसेस पैकी ४० ईलेक्ट्रीक बसेस या खरेदी करण्याचे निश्चित करण्याचे आले असुन या आधारे ४० ईलेक्ट्रीक बसेस खरेदी करण्याकरिता विहीत करण्यात आलेल्या मुदतीमुळे आर.एफ.पी प्रसिद्ध करण्यात आली आहे, यास मा. परिवहन समितीने कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवून हा विषय धोरणात्मक असल्यामुळे महानगरपालिकेच्या महासभेपुढे सादर करण्यात यावा या मा. सभापती, परिवहन समिती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ०४** :— नागपूर शहरातील महिलांसाठी व प्रवासी महिलांकरिता मोबाईल टॉयलेट योजना राबवुन सुलभ प्रसाधन गृहाची व्याप्ती वाढविण्याकरिता जुने भंगार बस चा वापर सुलभ फिरते शौचालयाकरिता करण्याचे मा. महापौरजी यांनी निर्देशित केलेले असुन याकरिता प्रावधानाची तरतुद महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेली आहे.

प्रायोगीक तत्वावर मनपा मालकीच्या दोन जुन्या स्डॅडर्ड बसेस यांना फिरते शौचालयामध्ये रूपांतरीत करण्याकरिता व मे. साराप्लॉस्ट प्रा.लि., पुणे हे देशातील एकमेव अधिकृत कंपनी असल्यामुळे उपरोक्त काम सदर फर्मला देण्याकरिता व कंपनीच्या प्रस्तानुसार येणाऱ्या खर्चास उक्त प्रस्ताव स्थायी समिती समक्ष पाठविण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून आर्थिक बाबींशी संबंधित विषय असल्यामुळे तसेच याच्या निविदा न झाल्यामुळे बीओटी तत्वावर मान्यता देण्याकरिता मा. स्थायी समितीपुढे विषय सादर करण्यात यावा या मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ०५** :— मा. सभापती, परिवहन समिती यांनी दिलेल्या तत्वत: मान्येतेनुसार व मा. अपर आयुक्त यांचे दि. ८/११/२०१९ वरील मान्यतेनुसार ०१ विना तिकिट ते ०५ विना तिकिट आढळलेल्या दोषी वाहकास तिसऱ्या वेळेस शेवटची संधी देवून एस.ओ.पी.मधे ठरलेल्या कालावधी नुसार एक अपहार प्रकरणी रु. दोन हजार प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करुन आय.डी. उघडण्यात आलेल्या आहेत. यास कार्योत्तर मंजुरी देण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

२. दि.३०/१२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. सभापती यांनी अपहारकर्त्या वाहकांसाठी स्वतंत्र चौकशी विभाग तयार करण्याचे व अशा वाहकांची आय.डी. बंद करुन कामावरुन वंचित करण्यापुर्वी त्यांना सुनावणीची संधी देण्यास्तव सर्वश्री रविंद्र पागे, प्रशासकीय अधिकारी, अरुण पिपरुडे, श्रम तथा जनसंपर्क अधिकारी, सुर्यकांत आंबाडेकर, आर.टी.एल. (डिम्ट्स) यांची ०३ सदस्यीय समिती गठीत करुन दर १५ दिवसांनी प्रकरणे तपासुन जर अपहारकर्ता वाहक दोषी आढळल्यास आय.डी. बंद करण्याचा निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून याकरिता संबंधित वाहक चेकर्स व डपो मॅनेजर यांनी सुनावणीची नोटीस बजावणे, सुनावणीची तारिख, वेळ, स्थळ निश्चित करण्याची जबाबदारी मे. डिम्स् यांनी पार पाडावी या मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ०६</u>** :— नागपूर शहरबस परिवहन सेवेमध्ये मे. युनिटी सेक्युरिटी सर्व्हिसेस व मे. सेक्युरिटी व इंटेलिजन्स सर्व्हिसेस (इंडिया) लि., एस.आय.एस. हे कार्यरत आहेत. मे. सेक्युरिटी व इंटेलिजन्स सर्व्हिसेस (इंडिया) लि., एस.आय.एस. यांनी त्यांचे पत्र दि.२९/११/२०१९ अन्वये त्यांच्या सेवा मनपास देण्याची असमर्थता दर्शविलेली असून कंत्राट बंद करण्याची विनंती केलेली आहे. यानुसार विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. १/१/२०२० ला मंजुरी प्रदान केलेली आहे. या अनुषंगाने त्यांचेकडे असलेले वाहक कर्मचारी पुर्ण आस्थापना व इंफ्रास्ट्रक्चर्ससह मे. युनिटी सेक्युरिटी सर्व्हिसेस, नागपूर यांचेकडे नविन एजेंसी आर.एफ.पीद्वारे नियुक्त होईस्तोवर हस्तांतरित करण्याचा व उपायुक्त/परिवहन व्यवस्थापक यांचेकडे झालेल्या दि.०६/१२/२०१९ च्या सभेमध्ये मे. डिम्ट्स/आय.बी.टी.एम. यांना नविन वाहक पुरवठा एजेंसी नियुक्त करण्याकरीता आर.एफ.पी. तयार करण्यास्तव दिलेले निर्देश मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून समितीने यास एकमताने मान्यता प्रदान केली.

तद्नंतर मा. सभापती यांनी शहर बस चालविण्यासाठी देण्यात आलेल्या कंपनीच्या डायरेक्टर सोबत मा. आयुक्तांची एक बैठक बोलाविण्यात यावी असे सुचित करून मा. सदस्य आणि नागरिकांच्या आलेल्या तक्रारी लक्षात घेता मे. हंसा प्रा.लि. कंपनीला डेपो करिता दिलेल्या जागेत खाजगी शाळेच्या बसेस पार्क केल्याचे दिसून येतात करिता यानंतर बसेस पार्क करण्यात येवू नये अन्यथा प्रत्येकी बस १ हजार रुपये दंड आकारण्यात येईल असे पत्र कंपनीला देण्यात यावे असे मा. सभापती यांनी निर्देशित केले.

**<u>ठराव क्रमांक ०७</u>** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करुन सभा अनिश्चित काळाकरीता स्थगीत करण्यात आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **सभापती** |
| **ना.म.पा. नागपूर** | **परिवहन समिती** |